पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग, 3333
क्र.लेखा/१७ /कावि/ /२०१८
दिनांक :-१६/०३/२०१८

विषय :- स्थापत्य विषयक कामे पार पडताना त्यातील बाबींमध्ये मोठया प्रमाणावर होणा-या Variation बाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये विविध प्रकारची कामे करण्यात येतात. ही कामे करतांना public works department मॅन्युअल मधील नियमानुसार केली जाणे अपेक्षित आहे. यासाठी प्रशासकीय मान्यता घेताना block estimate व इतर दस्ताऐवज तयार करुन त्यानंतर प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर, तांत्रिक मान्यतेनुसार कामे पार पाडणे आवश्यक आहे. यामध्ये विचलन होत असल्यास सक्षम मान्यता घेणे आवश्यक आहे. मात्र असे निदर्शनास आले आहे की, अनेक कामे अंदाजपत्रकानुसार पार पाडली जात नसून त्यातील बाबींच्या (Items) प्रमाणामध्ये मोठया प्रमाणावर Variation असतात. तसेच अंदाजपत्रकामध्ये नसलेल्या बाबींची कामे केली जातात. कामांच्या Scope मध्ये देखील अनेक कामांमध्ये बदल केला जाते. व यांस सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेण्यात येत नाही.

या बाबी गंभीर स्वरुपाच्या असून सक्षम मान्यतेशिवाय करण्यात आलेल्या कामांमध्ये भविष्यामध्ये लेखापरिक्षण आक्षेप उपस्थित होवू शकतात. तरी शासनांने घालून दिलेले नियम व मार्गदर्शक तत्वे यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. अन्यथा याची जबाबदारी संबंधित कामांच्या नियंत्रित अधिकारी यांचेवर निर्धारीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८